सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - १०३ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. ३० मे २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

# माहिती असूनही कारवाई नाही! १५ जणांच्या मृत्यूनंतर पोलिसांवर निलंबनाची कारवाई

## अवैध दारूकडे दुर्लक्ष महागात!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०पुणे** –हडपसर परिसरात विषारी दारू पिऊन १५ निर्दोष नागरिकांचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना अजूनही अनेकांच्या मनात भीती आणि दुःख निर्माण करत आहे. या दुर्घटनेत पोलिस यंत्रणेच्या निष्काळजीपणाला जबाबदार धरत पुणे शहर पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी तीन वरिष्ठ अधिकाऱ्यांना निलंबित करण्याचे आदेश दिले आहेत. ही कारवाई कर्तव्यदक्षतेच्या अभावामुळे पोलिस दलाच्या प्रतिमेला झालेल्या धक्क्याची प्रतीक बनली आहे.

हडपसर पोलिस ठाण्यातील वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय मोगले, हडपसर पोलिस चौकीच्या प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक हसीना शिकलगार आणि गुन्हे शोध पथकातील पोलीस उपनिरीक्षक हसन मुलाणी या तीनही अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करण्यात आले आहे. अवैध दारू विक्रीची माहिती असतानाही त्यांनी प्रभावी कारवाई न केल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. या निष्काळजीपणामुळे सामान्य माणसांचे जीव गेले, याची जबाबदारी या अधिकाऱ्यांवर येऊन पडली आहे.हडपसर पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या या घटनेत गावठी किंवा विषारी दारू पिऊन १२ जणांचा मृत्यू झाला. अनेक कुटुंबे एकाएकी उद्ध्वस्त झाली. काहींचे कर्ते पुरुष गेल्याने विधवा झालेल्या बायका आणि अनाथ झालेली मुलं यांचे भवितव्य अंधारात बुडाले आहे. रोजच्या धडपडीत गुजराण करणारे हे लोक फक्त एक घोट घेऊन कायमचे डोळे मिटले, ही वेदना शब्दांत व्यक्त करणे कठीण आहे. या घटनेने संपूर्ण हडपसर परिसरात शोककळा पसरली आहे.




या प्रकरणात हडपसर पोलिस ठाण्यात संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असला तरी, गुन्हे घडण्यापूर्वीच अवैध दारू विक्री रोखण्यात पोलिस अपयशी ठरल्याचे स्पष्ट दिसते. माहिती असूनही हलगर्जीपणा केल्याने निष्पाप लोकांचे प्राण गेले. पोलिस दल ज्यांचे रक्षण करायला हवे, त्यांच्याच जीविताला धोका निर्माण झाला, ही बाब अत्यंत गंभीर आहे. या घटनेमुळे पोलिसांच्या विश्वासार्हतेवरही गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

पोलिस आयुक्तांच्या या त्वरित कारवाईने काही प्रमाणात विश्वास दाखवला असला तरी, पीडित कुटुंबियांना न्याय मिळवून देणे आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी कठोर उपाययोजना करणे गरजेचे आहे. निलंबित अधिकाऱ्यांवर विभागीय चौकशी सुरू झाली असून, दोषींवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

# यूपी-बिहारमध्ये पाऊस-वादळामुळे ४८ लोकांचा मृत्यू

## सहारनपूरमध्ये ट्रॅक्टरसह १० गाड्या वाहून गेल्या; बिहारमध्ये ४ विमानांचे मार्ग बदलले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०सहारनपूरम** देशात उष्णतेच्या लाटेदरम्यान १५ राज्यांमध्ये पावसाचा अलर्ट जारी करण्यात आला आहे. बिहारमध्ये गेल्या २४ तासांत वादळी पाऊस आणि वीज कोसळल्याने १७ लोकांचा मृत्यू झाला आहे. पाटण्यात पावसामुळे ४ विमाने वळवण्यात आली, तर १८ विमानांना उशीर झाला. यामुळे सुमारे ५०० हून अधिक प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागला. आज राज्यातील २५ जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता आहे. उत्तर




प्रदेशात गेल्या २४ तासांत वादळी वाऱ्यामुळे ३१ लोकांचा मृत्यू झाला आहे. सहारनपूरमध्ये मुसळधार पावसानंतर डोंगरावरून वेगाने पाणी खाली आले. यामुळे इनोव्हा-ट्रॅक्टरसह १० वाहने वाहून गेली. आजही सर्व ७५ जिल्ह्यांमध्ये पावसाचा अलर्ट आहे.

राजस्थानमध्ये शनिवारी ३० जिल्ह्यांमध्ये वादळी वाऱ्यासह गारपीट होण्याची शक्यता आहे. एक दिवसापूर्वी चुरू, हनुमानगड, बिकानेर, सीकरसह ९ जिल्ह्यांमध्ये तापमान १० अंशांपर्यंत खाली आले.

मान्सून ७ दिवसांत केरळमध्ये दाखल होईल

दरम्यान, भारतीय हवामान विभागाने (खचऊ) सांगितले आहे की नैऋत्य मान्सून पुढील ७ दिवसांत केरळमध्ये दाखल होऊ शकतो. मात्र, विभागाने यावर्षी मान्सून सामान्यपेक्षा कमकुवत राहण्याचा अंदाजही वर्तवला आहे.

खचऊनुसार, जून ते सप्टेंबर या कालावधीत देशात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडू शकतो. यावेळी मान्सूनचा पाऊस दीर्घकालीन सरासरी (डझ-) च्या सुमारे ९०% राहण्याची शक्यता आहे. देशात सामान्य मान्सून पावसाची सरासरी ८७ सेंटीमीटर मानली जाते. हवामान विभागाने सांगितले की, ईशान्य भारतात सामान्य पाऊस पडू शकतो, परंतु इतर अनेक भागांमध्ये सामान्यपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता आहे. विशेषतः पावसावर अवलंबून असलेल्या शेती क्षेत्रांमध्ये मान्सून कमकुवत राहू शकतो.

## अमरावती विधानपरिषद निवडणूक काँग्रेसकडून
# हर्षजित देशमुख यांचा उमेदवारी अर्ज दाखल
### भाजपचे प्रवीण पोटे यांच्याशी थेट लढत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती –**
अमरावती विधानपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग आला असून काँग्रेसचे उमेदवार हर्षजित देशमुख यांनी आज आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. नागपूर येथील प्रसिद्ध उद्योजक असलेले देशमुख यांनी महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या उपस्थितीत नामांकन भरले.यावेळी खासदार बळवंत वानखडे, काँग्रेसचे स्थानिक पदाधिकारी तसेच महाविकास आघाडीतील विविध पक्षांचे नेते उपस्थित होते. महाविकास आघाडीने अमरावती विधानपरिषद निवडणुकीसाठी काँग्रेसकडून हर्षजित देशमुख यांना अधिकृत उमेदवारी जाहीर केली आहे.या निवडणुकीत भाजपचे उमेदवार प्रवीण पोटे आणि काँग्रेसचे हर्षजित देशमुख यांच्यात थेट लढत होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे हा सामना चुरशीचा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.दरम्यान, उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर हर्षजित देशमुख यांनी प्रतिक्रिया देताना भाजपमध्ये प्रचंड अंतर्गत कलह असल्याचा आरोप केला. या परिस्थितीचा फायदा महाविकास आघाडीला होईल आणि या निवडणुकीत महाविकास आघाडीचाच उमेदवार विजयी होईल, असा दावा त्यांनी केला



### अखेरच्या क्षणी बदलेल का निवडणुकीचा चेहरा?

राजकीय विश्लेषकांचे स्पष्ट मत आहे की स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये शेवटच्या क्षणापर्यंत काहीही निश्चित मानता येत नाही. १ जून रोजी 'बी फॉर्म'मध्ये अन्य कोणाचे नाव नोंदवले गेले, तर अमरावतीतील संपूर्ण निवडणुकीचे समीकरण बदलू शकते. सध्या हर्षजीत देशमुख हे काँग्रेसचे प्रमुख चेहरा म्हणून नेतृत्व करत आहेत. मात्र, 'बी फॉर्म'वरील सस्पेन्स संपल्यानंतरच काँग्रेसचा हा गड नेमका कोणाच्या नेतृत्वाखाली लढवला जाणार, हे स्पष्ट होणार आहे.

# बंगालमध्ये अभिषेक बॅनर्जींना मारहाण:अंडी फेकली, शर्ट फाडले
### चोर-चोरच्या घोषणा दिल्या, हेल्मेट घालून बाहेर काढले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०सोनारपूर**
पश्चिम बंगालमधील सोनारपूर येथे टीएमसी खासदार अभिषेक बॅनर्जी यांच्यावर हल्ला झाला आहे. ते येथे निवडणुकीतील हिंसाचारात जखमी झालेल्या टीएमसी कार्यकर्त्यांना भेटायला गेले होते.आरोप आहे की, ते तिथे पोहोचताच भाजप कार्यकर्त्यांनी त्यांना घेरले आणि घोषणाबाजी करत त्यांच्यावर हल्ला केला. लोकांनी त्यांच्यावर अंडी फेकली, त्यांचा शर्ट फाडला. अभिषेक यांना हेल्मेट घालून तिथून बाहेर काढण्यात आले.

माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचे भाचे अभिषेक म्हणाले - हे लोक मला मारू इच्छित होते. माझा शर्ट फाडला. घटनास्थळी एकही पोलिस नव्हता. हेल्मेटमुळे डोके वाचले. अशा हल्ल्यांनी आम्ही घाबरणार नाही.

यापूर्वी अभिषेक यांना पश्चिम बंगाल सीआयडीने कथित बनावट स्वाक्षरी प्रकरणात समन्स पाठवले आहे. त्यांना सोमवारी दुपारी १२ वाजता सीआयडी मुख्यालय भवानी भवन येथे चौकशीसाठी बोलावले आहे. पीटीआयनुसार, सीआयडी अधिकाऱ्यांनी




शनिवारी त्यांच्या कालीघाट येथील निवासस्थानी जाऊन नोटीस दिली.सोनारपूर दक्षिण २४ परगणा जिल्ह्यात आहे. येथे टीएमसी आणि भाजपमध्ये तीव्र स्पर्धा आहे. निवडणुकांदरम्यान आणि नंतर राजकीय तणाव वाढल्यामुळे हा परिसर अनेकदा हिंसाचार आणि संघर्षाच्या बातम्यांमध्ये राहिला आहे.

# राज्य सरकारचा दृष्टिकोन कोणत्याही समाजाविरोधात नसून सर्व समाजांचे हित साधण्याचा - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस
## आंदोलनकर्त्यांना संयम राखण्याचे केले आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०मुंबई–** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवाली सराटी येथे आमरण उपोषण सुरू केल्यानंतर राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापले आहे. कडक उन्हात सुरू असलेल्या या आंदोलनाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर महत्त्वाची प्रतिक्रिया दिली आहे. सध्या मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष तथा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील हे मनोज जरांगे पाटील यांच्याशी चर्चा करत असून, या चर्चेतून काही तोडगा निघतो का याकडे सर्वांचे लक्ष आहे. दरम्यान, सरकारची भूमिका स्पष्ट करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आंदोलनकर्त्यांना संयम राखण्याचे आवाहन केले आहे.

मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाबाबत बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी सरकार या प्रश्नावर सकारात्मक आणि पारदर्शक भूमिकेत असल्याचे सांगितले. मराठा आरक्षणाच्या विषयात अनेक वेळा सरकारने पुढाकार घेतला असून, आवश्यक ते निर्णयही घेतले आहेत, असे त्यांनी नमूद केले.



परिस्थितीनुसार अडचणी निर्माण झाल्या तेव्हाही सरकारने मार्ग काढण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे राज्य सरकारचा दृष्टिकोन कोणत्याही समाजाविरोधात नसून सर्व समाजांचे हित साधण्याचा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री म्हणाले की, राज्य सरकार कोणत्याही दोन समाजांमध्ये संघर्ष निर्माण करण्याच्या भूमिकेत नाही. समाजांना एकमेकांसमोर उभे करून राजकारण करण्याऐवजी सर्वांचे प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न सरकार करत आहे. मराठा समाजाच्या मागण्यांवर चर्चा सुरू असून त्याबाबतची भूमिका वेळोवेळी स्पष्ट करण्यात आली आहे. त्यामुळे सरकारकडून सकारात्मक प्रयत्न सुरू असल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला. तसेच या विषयावर संवाद आणि चर्चेच्या माध्यमातून तोडगा काढण्याचा प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले.



## संपादकीय ......

# सूर्यवंशीच्या फलंदाजीचे तुफानी वैभव

*अल निनोच्या प्रभावामुळे भारतासह जगभरातील अनेक देशांना सध्या उष्णतेच्या लाटेचा सामना करावा लागतोय. यावर्षी वातावरणात किमान २ ते ५ अंश सेल्सिअसची वाढ नोंदवण्यात आली असून उन्हाचा तडाखा सर्वांनाच हैराण करतोय. अगदी याचप्रमाणे क्रिकेटच्या मैदानातही सूर्यासारखा तळपणारा एक युवा खेळाडू प्रतिस्पर्धी संघांना आपल्या बॅटचा तडाखा देतोय. त्याच्या आक्रमक आणि झंझावाती खेळीने सगळेच प्रतिस्पर्धी संघ हतबल झालेत. या युवा खेळाडूचे नाव आहे वैभव सूर्यवंशी. यंदाच्या इंडियन प्रीमियर लीगचा एकोणिसावा अध्याय सूर्यवंशीने धडाकेबाज फलंदाजीने गाजवलाय.*

*आयपीएलचा सीझन आपल्या अंतिम टप्प्यात पोहोचलाय. क्वालिफायरच्या पहिल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने गुजरात टायटन्सचा पराभव करून अंतिम सामन्यात प्रवेश केलाय. तर एलिमिनेटर सामन्यात राजस्थान रॉयल्सने वैभव सूर्यवंशीच्या धडाकेबाज खेळीच्या जोरावर सनरायझर्स हैदराबादचा पराभव करून क्वालिफायरच्या दुसर्या सामन्यात प्रवेश केलाय. क्वालिफायर २ मध्ये जिंकणारा राजस्थान किंवा गुजरातचा संघ ३१ मे रोजी होणार्या अंतिम सामन्यात बंगळुरूशी भिडेल. ही तर झाली आयपीएलच्या यंदाच्या सीझनची वाटचाल. या वाटचालीत, किंबहुना संपूर्ण स्पर्धेत, वैभव सूर्यवंशीने आपल्या चमकदार कामगिरीची छाप सोडली आहे. विशेषकरून त्याने हैदराबादविरुद्ध २९ चेंडूत ठोकलेल्या ९७ धावांच्या खेळीने सर्वजण मंत्रमुग्ध झालेत. नाही म्हटले तरी या सीझनमध्ये वैभवने याआधी हैदराबादविरुद्ध एक शतक झळकावले असून लखनऊविरुद्ध ९३ धावांची खेळीही केली होती. तरी यावेळच्या ९७ धावांच्या झंझावाताचा अंदाज वेगळाच होता.ख्रिस गेलचा सर्वात कमी चेंडूत जलद शतक बनवण्याचा रेकॉर्ड मोडण्यात वैभव अवघ्या ३ धावांनी कमी पडला. परंतु याच सामन्यात त्याने १२ षटकार ठोकून गेलचाच एका आयपीएल सीझनमध्ये सर्वाधिक ५९ षटकार मारण्याचा विक्रम आरामात मोडला. वैभवच्या नावे ६० हून अधिक षटकार असून गुजरातविरुद्धच्या सामन्यात त्यामध्ये नक्कीच भर पडेल. शिवाय या सीझनमध्ये सर्वाधिक धावा करणार्याला मिळणारी ऑरेंज कॅपही त्याच्याच डोक्यावर आहे. क्रिकेट तज्ज्ञांच्या मते अवघ्या १५ वर्षांचा हा वंडर बॉय क्रिकेटच्या मैदानातला जणू एक चमत्कार आहे. त्याच्यासारखा प्रचंड प्रतिभावान खेळाडू दशकातूनच एकदा जन्माला येतो. गेल्या वर्षीच्या आयपीएल सीझनआधी बीसीसीआयच्या क्रिकेट स्काऊट्सनी वैभवला हुडकून काढले होते. तेव्हा हा साडेतेरा, चौदा वर्षांचा पोरगा त्यांच्यापेक्षा वयाने दुप्पट असलेल्या गोलंदाजांना सळो की पळो करून सोडत होता. अर्थात ते क्लब लेव्हलचे क्रिकेटही नव्हते.*

*बिहारसारख्या मागास राज्यातून आलेल्या या अद्भुत युवा प्रतिभेवर राहुल द्रविडसारख्या चाणाक्ष प्रशिक्षकाची नजर पडली. ३० लाख रुपयांच्या बेस प्राईझपासून सुरू झालेल्या आयपीएलच्या बोलीत राजस्थान रॉयल्सने त्याला चक्क १ कोटी १० लाख रुपये मोजून आपल्या ताफ्यात घेतले. द्रविडसह राजस्थान संघ व्यवस्थापनाने त्याच्या प्रतिभेला पैलू पाडले. तेव्हापासून हा स्फोटक फलंदाज भल्याभल्या गोलंदाजांना घाम फोडू लागला. गेल्या आयपीएलमध्ये वैभवने ७ सामने खेळून एक शतक आणि एक अर्धशतक ठोकले तेव्हा तो स्लॉगर अर्थात डोळे बंद करून कशीही आडवी-तिडवी बॅट फिरवणारा खेळाडू असल्याची टीका झाली होती. परंतु गेल्याच वर्षी भारताला अंडर-१९ वर्ल्डकप मिळवून देण्यातही वैभवने महत्त्वाची भूमिका बजावली. याचदरम्यान वैभवने प्रथमश्रेणी सामने खेळायला सुरुवात केली आणि तिथेही आपली छाप पाडली. आता तर त्याने आयपीएलमध्ये वेगवेगळ्या संघांकडून खेळणारे अव्वल दर्जाचे जलदगती आणि फिरकी अशा सर्वच गोलंदाजांची धुलाई करत टीकाकारांचे दात घशात घातले.*

*वैभवने मैदानात पाऊल टाकताच हायव्होल्टेज ड्रामा सुरू होतो. सामन्याच्या पहिल्या चेंडूपासूनच तो चेंडू तडकावू लागतो. मग तो ऑस्ट्रेलियाचा पॅट कमिन्स असो, दक्षिण आफ्रिकेचा कगिसो रबाडा असो किंवा भारताचा जसप्रीत बुमराह, मोहम्मद शमी अथवा भुवनेश्वर कुमार, या पठ्ठ्याच्या बॅटने कुणालाही दयामाया दाखवलेली नाही. चेंडू आपल्या रेंजमध्ये आला की थेट सीमेपलीकडे गेलाच पाहिजे हा त्याचा माइंडसेट. त्याचे बेफिकिरीचे वय त्याला कुठल्याही दडपणाशिवाय धाडसाने खेळायला प्रवृत्त करते. चेंडूवर रोखलेली बारीक नजर, अचूक टायमिंग, शरीराच्या चपळ हालचाली, तंत्रशुद्ध फूटवर्क आणि विजेच्या गतीने चेंडूवर तुटून पडणारी त्याची बॅट, या सगळ्या कॉम्बिनेशनमुळे वैभव एक स्फोटक फलंदाज ठरतो. सचिनचे क्रिकेटमध्ये पदार्पण झाले तेव्हा तो १६ वर्षांचा होता. सध्या त्याची युवराज सिंगपासून ते शाहिद आफ्रिदीपर्यंत सर्वांचीच तुलना होतेय. वैभवची कारकीर्द किती मोठी असेल? माहीत नाही. क्रिकेटच्या ग्लॅमरस दुनियेत झटपट मिळणारे नेम आणि फेम त्याला सांभाळता येईल की नाही? माहीत नाही. पुढचे पुढे. पण सध्यातरी तो क्रिकेट जगतातल्या प्रत्येक खेळाडूच्या मनात भरलाय. यामागचे कारण म्हणजे मैदानाबाहेरची त्याची वागणूक.कधी तो मैदानात प्रचंड मेहनत करताना दिसतो, तर कधी धोनी, गावस्कर आदी सिनियर क्रिकेटर्सच्या पाया पडताना दिसतो. याच नम्रपणामुळे सचिनपासून सर्वच खेळाडू त्याचे कौतुक करताना थकत नाहीत. क्रिकेट जगतात आपल्या नावाची अल्पावधीतच हवा बनवणार्या वैभवला आता भारतीय क्रिकेट संघाची निळी जर्सी खुणावू लागलीय. भारत पुढच्या दोन-चार महिन्यांत आयर्लंड, इंग्लंड, झिम्बाब्वे आणि वेस्ट इंडिजसोबत सामने खेळणार आहे. याचवेळी सप्टेंबरमध्ये एशियन गेम्स होतील. तेव्हा एक ज्युनियर संघ वेस्ट इंडिजला जाईल आणि एक सिनियर संघ एशियन गेम्स खेळेल, असे म्हटले जात आहे. यापैकी कुठल्याही एका संघात वैभवचे पदार्पण निश्चित मानले जात आहे. त्यावेळी वैभवचे वय अवघे साडेपंधरा वर्षांचे असेल. कुणी कितीही म्हणो, वैभव अजून लहान आहे किंवा त्याला अजून अनुभवाची गरज आहे. त्या सर्वांनी एकच गोष्ट लक्षात ठेवायला हवी की वेगाने घोंगावणार्या वादळाला जास्त काळ अडवून ठेवता येणार नाही. वैभव सूर्यवंशी नावाचे क्रिकेटच्या जगतातले असेच एक वादळ आहे, जे निळ्या जर्सीत आल्यास प्रतिस्पर्धी संघाची दाणादाण उडवल्याशिवाय राहणार नाही.*

# सीबीएसई विद्यार्थ्यांना दिलासा; पुनर्मूल्यांकन शुल्कात मोठी कपात

**विदर्भ प्रजासत्ताकदि.३०अमरावती** केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (सीबीएसई) बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी उत्तरपत्रिका पुनर्मूल्यांकन प्रक्रियेतील शुल्कात मोठी कपात करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे निकालाबाबत साशंकता असलेल्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार असून, अधिकाधिक विद्यार्थ्यांना पुनर्पडताळणीची संधी उपलब्ध होणार आहे.नव्या शुल्क संरचनेनुसार उत्तरपत्रिकेची स्कॅन कॉपी मिळविण्यासाठी पूर्वी आकारले जाणारे ७०० रुपये शुल्क कमी करून केवळ १०० रुपये करण्यात आले आहे. तसेच गुण पडताळणीसाठीचे शुल्क ५०० रुपयांवरून १०० रुपये करण्यात आले असून, प्रत्येक प्रश्नाच्या फेरतपासणीसाठी विद्यार्थ्यांना आता १०० रुपयांऐवजी फक्त २५ रुपये मोजावे लागणार आहेत. विशेष म्हणजे,



फेरतपासणीनंतर विद्यार्थ्यांच्या गुणांमध्ये एक जरी गुणाची वाढ झाली, तरी त्यांना भरलेले संपूर्ण शुल्क परत करण्यात येणार आहे.निकालानंतर अपेक्षेपेक्षा कमी गुण मिळाल्याची भावना अनेक विद्यार्थ्यांमध्ये असते. मात्र, जास्त शुल्कामुळे अनेक जण पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज करण्यास टाळाटाळ करीत होते. आता शुल्कात झालेल्या मोठ्या कपातीमुळे विद्यार्थ्यांचा आर्थिक भार कमी होणार असून, अधिक विद्यार्थी या सुविधेचा लाभ घेण्याची शक्यता आहे.सीबीएसईकडून उत्तरपत्रिकांची तपासणी 'ऑन-स्क्रीन मार्किंग' या डिजिटल पद्धतीने केली जाते. या प्रक्रियेमुळे तपासणी अधिक अचूक आणि पारदर्शक होत असल्याचा दावा मंडळाने केला आहे. तरीही विद्यार्थ्यांना स्वतःची खात्री करून घेण्याची संधी उपलब्ध करून देण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.निकाल जाहीर झाल्यानंतर स्कॅन कॉपी, गुण पडताळणी आणि प्रश्ननिहाय फेरतपासणीसाठी टप्प्याटप्प्याने ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू केली जाते. विद्यार्थ्यांनी सीबीएसईच्या अधिकृत संकेतस्थळावर निर्धारित वेळेत अर्ज करणे आवश्यक राहणार आहे. या निर्णयामुळे विद्यार्थी आणि पालकांच्या खिशावरील अतिरिक्त आर्थिक ताण मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे.-

# सामुदायिक प्रार्थना : आध्यात्मिक, सामाजिक आणि राष्ट्रीयतेची दिव्य अनुभूती...

मानवतेचे महान पुजारी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी मानवतेच्या कल्याणासाठी आणि विश्वशांतीच्या स्थापनेसाठी सामुदायिक प्रार्थनेचा विचार समाजासमोर ठेवला. ही प्रार्थना केवळ धार्मिक विधी नसून मानवतेला एकत्र आणणारी, माणसाच्या अंतःकरणाला स्पर्श करणारी आणि समाजात प्रेम, शांतता व बंधुभाव निर्माण करणारी उपासना आहे. म्हणूनच सामुदायिक प्रार्थना ही आध्यात्मिक, सामाजिक आणि राष्ट्रीयतेची दिव्य अनुभूती मानली जाते.



सामुदायिक प्रार्थनेतील आध्यात्मिकता ही माणसाच्या अंतःकरणातील अहंकार, द्वेष, मत्सर आणि अस्वस्थता दूर करून मनाला शांतता देते. ती माणसाला आत्मपरीक्षणाची आणि आत्मशुद्धीची प्रेरणा देते. प्रार्थनेच्या माध्यमातून मनुष्य स्वतःच्या अंतर्मनाशी जोडला जातो आणि मानवतेच्या व्यापक भावनेशी एकरूप होतो. येथे कोणत्याही एका धर्माचा आग्रह नसून सर्व धर्मांचा आदर आणि विश्वकल्याणाची भावना आहे. त्यामुळे सामुदायिक प्रार्थना ही मनाला उन्नत करणारी आणि जीवनाला सकारात्मक दिशा देणारी आध्यात्मिक साधना ठरते.

सामुदायिक प्रार्थनेतील सामाजिक स्वरूप हे आज समाजात जात, धर्म, पंथ, भाषा, प्रांत आणि विचार यांच्या नावावर भिंती निर्माण होत आहेत. माणूस माणसापासून दूर जात आहे. अशा परिस्थितीत सामुदायिक प्रार्थना समाजाला एकत्र आणण्याचे कार्य करते. येथे सर्वजण समान पातळीवर एकत्र येतात,कुणी उच्च-नीच नाही. प्रेम, सहकार्य, बंधुभाव आणि परस्पर सन्मान हे संस्कार या प्रार्थनेतून घडतात. ही सामुदायिक प्रार्थना माणसाला माणूस म्हणून जगण्याची शिकवण देते.

सामुदायिक प्रार्थना राष्ट्रीयतेचीही दिव्य अनुभूती देते. देशाच्या प्रगतीसाठी आणि राष्ट्राच्या ऐक्यासाठी नागरिकांमध्ये राष्ट्रप्रेम, शिस्त, जबाबदारी आणि समर्पणभाव असणे आवश्यक आहे. सामुदायिक प्रार्थना व्यक्तीला मी पासून आपण पर्यंत घेऊन जाते. येथे जाती धर्मापेक्षा देश अधिक महत्त्वाचा मानला जातो. राष्ट्रहित, समाजहित आणि विश्वहित ही भावना जागृत करण्याचे सामर्थ्य या सामुदायिक प्रार्थनेमध्ये आहे. त्यामुळे सामुदायिक प्रार्थना ही राष्ट्रीय एकात्मतेचा आणि विश्वबंधुत्वाचा संदेश देणारी आहे.

चला तर मग आज ३० मे २०२६ रोजी या सामुदायिक प्रार्थना आपण आपल्या परिवारासह सहभागी होऊया आणि आपले जीवन कृतार्थ करूया...

**श्रीकृष्ण पखाले अमरावती.**

# वडनेरगंगाई गावात १३ लाखांची घरफोडी

## ११५ ग्रॅम सोने, ४ लाख ५० हजारांची रोकड लंपास

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०वडनेरगंगाई-** ग्रामिण भागात चोऱ्या, धाडसी घरफोड्या सतत वाढत आहेत. येवदा ठाण्याच्या हद्दीत वडनेर गंगाई येथे बंद घराला लक्ष्य करून १३ लाख ५ हजारांचा मुद्देमाल चोरांनी लंपास केला. गोपाल मधुकर रेवस्कर (वय ४१, रा. वडनेर गंगाई) हे कुटुंबासह बाहेरगावी गेले होते. बाहेर गावात परत आले असता, त्यांना घराचे कुलूप तोडून चोरी झाल्याचे निदर्शनात आहे. चोरांनी घरातील लोखंडी व लाकडी कपाटे हुसकून सामग्री अस्ताव्यस्त केल्याचे दिसून आले. कपाटातील १ लाख २९ हजार रुपयांचे १७ ग्रॅमचे मिनी मंगळसूत्र, २ लाख ३० हजार रुपयांचे २९ ग्रॅम वजनाचे दोन



सोन्याचे गोफ, २ लाख ६ हजारांची गहूमण्यांची २८ ग्रम वजनाची पोत, ४० हजार रुपयांचे ५ ग्रॅमचे पेंडाल, ४० हजार रुपयांचे कानातील ५ ग्रॅमचे टॉप्स, १ लाख ४७ हजार रुपयांचा २१ ग्रॅम वजनाचा सोन्याचा गोफ, ९० हजार रुपयांच्या सोन्याच्या दोन अंगठ्या, असे एकूण ८ लाख ५५ हजार रुपयांचे ११५ ग्रॅम सोन्याचे दागिने, यासोबतच दोन कपाटातून एकूण ४ लाख ५० हजार रुपयांची रोख रक्कम असा एकूण १३ लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरट्यांनी लंपास केला. गोपाल मधुकर रेवस्कर यांच्या तक्रारीवरुन येवदा पोलिसांनी घरफोडीचा गुन्हा दाखल केला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता, श्वानपथक, ठसेतज्ज्ञांसह फॉरेन्सिकच्या पथकानेही घटनास्थळी भेट दिली. येवदा पोलिस, स्थानिक गुन्हेशाखेच्या पोलिसांनी या घरफोडीनंतर सराईतांचे रेकॉर्ड तपासणी सुरू केली होती.

# टाकरखेडा संभू येथे तीव्र पाणीटंचाई

**नवीन जलकुंभ ठरला पांढरा हत्ती : मजीप्रा विरोधात नागरिकांचा संताप**

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३० टा. शंभू** टाकरखेडा संभू गावात गेल्या अनेक दिवसांपासून तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असून नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. नवीन जलकुंभ अद्यापही बंदच असल्याने नागरिक संतप्त झाले आहेत. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १०५ गाव प्रादेशिक ग्रामीण पाणीपुरवठा योजनेअंतर्गत गावाचा समावेश असला तरी नियोजनाच्या अभावामुळे नागरिक त्रस्त आहेत.

सुमारे सात हजार लोकसंख्या असलेल्या गावात सध्या दीड लाख हजार लिटर क्षमतेची जुनी पाण्याची टाकी कार्यरत आहे. या टाकीत रामा एमबीआरमधून पाणीपुरवठा केला जातो. दरम्यान, जल जीवन मिशन अंतर्गत दोन वर्षांपूर्वी आणखी ५० हजार लिटर क्षमतेची नवीन पाण्याची टाकी उभारण्यात आली; मात्र अद्याप त्या टाकीला पाइपलाइन जोडण्यात आलेली नाही. त्यामुळे नवीन जलकुंभ असूनही त्याचा कोणताही उपयोग नागरिकांना होत नसल्याचे चित्र आहे.

गावातील अनेक भागांमध्ये चार ते पाच दिवसांनी पाणी येत असल्याने नागरिकांना विहीर, हापशी तसेच इतरांच्या घरांवरून पाणी आणावे लागत आहे. विशेषतः भीमवाडी आणि झोपडपट्टी भागात परिस्थिती अधिक गंभीर झाली आहे. यासंदर्भात ग्रामपंचायतीचे उपसरपंच तथा प्रशासकीय सदस्य प्रदीप शेंडे यांनी प्रशासनाला वारंवार निवेदने देऊन तसेच आमदार, खासदार आणि आढावा बैठकीत प्रश्न उपस्थित करूनही अद्याप ठोस निर्णय झालेला नसल्याचा आरोप केला आहे. पाणी समस्या तातडीने सोडवली नाही तर ग्रामस्थांच्या वतीने उपोषण करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. दरम्यान,



टाकरखेड शंभू येथील रहिवासी शैलेश चांदूरकर यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मुख्य अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार सादर केली आहे. गेल्या एक महिन्यापासून नळाला अजिबात पाणी येत नसल्याने नागरिकांचे अतोनात हाल होत असल्याचे त्यांनी तक्रारीत नमूद केले आहे. नियमित पाणी बिल भरूनही पुरवठा होत नसल्याने प्रशासनाने तातडीने कारण शोधून पाणीपुरवठा पूर्ववत करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# धामणगावात शासकीय ज्वारी खरेदीला शुभारंभ

## ३ हजार ६९९ रुपये प्रति क्विंटल हमीभावाने शेतकऱ्यांना लाभ




**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०धामणगाव रेल्वे**

दत्तापूर (धामणगाव) खरेदी-विक्री समितीच्या वतीने शासनाने जाहीर केलेल्या किमान आधारभूत किंमत ३ हजार ६९९ रुपये प्रति क्विंटल दराने शासकीय ज्वारी खरेदीचा शुभारंभ करण्यात आला.

जुना धामणगाव येथील शासकीय गोदामात आयोजित कार्यक्रमात माजी आमदार वीरेंद्र जगताप यांच्या हस्ते काटा पूजन करून खरेदी प्रक्रियेची सुरुवात करण्यात आली. यावेळी ज्वारी विक्रीसाठी केंद्रावर आलेल्या शेतकऱ्यांचा सन्मानही करण्यात आला.

आसेगाव येथील शेतकरी नितीन मांडवगणे यांचा माजी आमदार वीरेंद्र जगताप यांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला दत्तापूर (धामणगाव) खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष बबनराव मांडवगणे, उपाध्यक्ष प्रदीप मुंधडा, संचालक मधुकर सावरकर, सुनील भोगे, हेमंत कडू, सुरेंद्र जयस्वाल, संकेत उभाड, डॉ. भगवंत शिंदे, मनोज वेरूळकर, मुकेश राठी, नरेंद्र पाचबुदे, भाऊराव अडकणे, श्रीकांत गावंडे, शालिनी कोंबे, मालती पावडे, गोदाम व्यवस्थापक यादव, खरेदी-विक्री संघाचे व्यवस्थापक एम. ए. बोकडे, ग्रेडर मनीष बंड यांच्यासह संघाचे कर्मचारी आणि तालुक्यातील अनेक शेतकरी उपस्थित होते. शासकीय हमीभावाने ज्वारी खरेदी सुरू झाल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण असून, आपल्या मालाला योग्य दर मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# जलसंधारणाचा परिणाम; खारपाण पट्ट्यात भूजलपातळीत वाढ

## अंजनगाव, दर्यापूर, भातकुली, अचलपूर, चांदूर बाजार तालुक्यात दिलासा

**विदर्भ प्रजासत्ताकदि.३० अमरावती**

गतवर्षीच्या पावसाळ्यात सरासरीपार पावसाने जमिनीचे पुनर्भरण झाले आहे. त्यात खारपाणपट्टयात उपसा कमी असल्याने यावेळी दर्यापूर, अंजनगाव सुर्जी व भातकुली, अचलपूर, चांदूर बाजार या तालुक्यात भूजलस्तरात वाढ झाल्याचे सुखद चित्र समोर आले आहे. बाशिवाय मेळघाटात मात्र भूजलस्तरात कमी आलेली आहे. जीएसडीएद्वारे सर्वेक्षणात १० तालुक्यातील भूजलात वाढ तर चार तालुक्यात घट झाल्याचे स्पष्ट झाले.गतवर्षीच्या पावसाळ्यात १० तालुक्यात सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाल्याने यंदा जिल्ह्याच्या भूजल पातळीत लक्षणीय बदल पाहायला मिळत आहेत. विशेषतः दरवर्षी कमी पाऊस असणाऱ्या खारपाणपट्टयात गतवर्षीच्या पावसाळ्यात सरासरीपेक्षा अधिक पावसाची नोंद झाली. त्यामुळेपावसाचे पाण्याचे पुनर्भरण होऊन या तीन तालुक्यांमध्ये पहिल्यांदाच भूजलस्तर वाढल्याचे दिलासाजनक चित्र समोर आले आहे.

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेद्वारे मार्चच्या अखेरीस जिल्हाभरात १३४ निरीक्षण विहिरींच्या नोंदी घेण्यात आल्या, या सर्वेक्षणात ही सकारात्मक माहिती समोर आली आहे. एकीकडे दिलासाजनक वातावरण असले तरी मेळघाटातील धारणी आणि चिखलदरा तालुक्यात मात्र भूजल पातळीत घट झाल्याचे निरीक्षणातून स्पष्ट झाले आहे.




### भूजल पातळीची तालुकानिहाय स्थिती

अंजनगाव तालुक्यात सर्वाधिक (३.०७ मी.) भूजल पातळी वाढली आहे. याशिवाय अचलपूर (१.९४), दर्यापूर (१.३१), चांदूरबाजार (१.०५), भातकुली (१.०४), तिवसा (०.४२), अमरावती (०.३३) मोर्शी (०.२०), धामणगाव (०.१९), चांदूर रेल्वे तालुक्यातही (०.१०) भूजलस्तर वाढला तर धारणी (१.१७ मी.) चिखलदरा (०.९७), वरुड (०.२६) व मोर्शी तालुक्यात (०.२० मी.) ने घट झाली आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# मान्सून काळातील आपत्कालीन परिस्थितीसाठी विभागात २४ तास नियंत्रण कक्ष सज्ज

## आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा

### – विभागीय आयुक्त नयना गुंडे यांचे आवाहन

### नागरिकांच्या मदतीसाठी जिल्हानिहाय संपर्क क्रमांक जारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती,**
अमरावती विभागामध्ये मान्सूनच्या कालावधीत निर्माण होणाऱ्या संभाव्य आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा पूर्णपणे सज्ज झाली आहे. मान्सूनच्या काळात अतिवृष्टी, पूर किंवा अन्य नैसर्गिक आपत्तींमुळे नागरिकांना तातडीने मदत मिळावी या उद्देशाने विभागीय आयुक्त कार्यालयासह विभागातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांमध्ये (अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशिय) 'आपत्कालीन नियंत्रण कक्ष' स्थापन करण्यात आले आहेत. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी मदतीसाठी प्रशासनाने जारी केलेल्या



अधिकृत दूरध्वनी क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन अमरावती विभागाच्या विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे.

शासनाच्या विशेष निर्देशानुसार, हे सर्व आपत्कालीन नियंत्रण कक्ष २४ तास आणि ३६५ दिवस अविरतपणे सुरू ठेवण्यात येणार आहेत. जेणेकरून कोणत्याही क्षणी नागरिकांना तातडीची मदत, बचावकार्य आणि योग्य मार्गदर्शन उपलब्ध करून देणे प्रशासनाला शक्य होईल.

नागरिकांच्या सुविधेसाठी जिल्हानिहाय संपर्क क्रमांक जाहीर करण्यात आले असून, विभागीय आयुक्त कार्यालयासाठी ०७२१-२६६१३६४ आणि अमरावती जिल्ह्यासाठी ०७२१-२६६२०२५ या क्रमांकांवर संपर्क साधता येईल. तसेच अकोला (०७२४-२४२४४४४), यवतमाळ (०७२३२-२४०७२०), बुलढाणा (०७२६२-२४२६८३) आणि वाशिम (०७२५२-२३४२३८) येथील नियंत्रण कक्षांशी नागरिकांना संपर्क साधून आवश्यक ती मदत मिळवता येईल.

# दापोरी येथील शेतकरी राजेंद्र नवघरे यांचा उष्माघाताने मृत्यू !

## मोर्शी तालुक्यात उष्माघाताचा पहिला बळी !

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०मोर्शी**
मोर्शी तालुक्यातील दापोरी येथील शेतकरी राजेंद्र बाबारावजी नवघरे वय ५५ वर्ष यांचा उष्माघातामुळे दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना समोर आली असून, मोर्शी तालुक्यातील उष्माघाताचा हा पहिला बळी ठरला आहे.

या घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत असून वाढत्या तापमानामुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या काही दिवसांपासून मोर्शी तालुक्यात तापमानाने उच्चांक गाठला असून दुपारच्या वेळेत उष्णतेची तीव्रता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. अशा परिस्थितीत शेतकरी वर्गाला शेतातील कामे करणे अत्यंत कठीण झाले आहे. दापोरी येथील शेतकरी राजेंद्र नवघरे हे दिनांक २८ मे रोजी नियमितप्रमाणे शेतातील कामासाठी शेतामध्ये गेले असता अचानक त्यांची प्रकृती बिघडली. त्यांना तातडीने अमरावती येथील पंजाबराव देशमुख रुग्णालयात उपचारासाठी रुग्णालयात दाखल



करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्यांचा दिनांक २९ मे रोजी मृत्यू झाला.

या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून शेतकरी वर्गामध्ये प्रशासनाच्या उपाययोजनांबाबत संताप व्यक्त केला जात आहे. ऐन उन्हाळ्यात तापमान ४५ अंशांच्या पुढे जात असताना ग्रामीण भागात आरोग्य सुविधा, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि उष्माघात प्रतिबंधक उपाय अपुरे असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

दरम्यान, उष्माघातामुळे मृत्यू झालेल्या कुटुंबाला शासनाकडून तातडीने आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थ व शेतकरी संघटनांकडून करण्यात येत आहे.

मोर्शी तालुक्यात वाढत्या तापमानामुळे नागरिकांनी दुपारच्या वेळेत बाहेर पडणे टाळावे, पुरेसे पाणी प्यावे आणि अत्यावश्यक काम असल्यासच उन्हात जाण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

राजेंद्र नवघरे यांच्या पार्थिवावर दिनांक ३० मे रोजी दापोरी येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार असून त्यांच्या मागे पत्नी व मुलगा असा आप्त परिवार असून नवघरे कुटुंबावर भीषण संकट ओढावले आहे.

# १० जूनचा अल्टिमेटम, अन्यथा वेटींगवरील लाभार्थ्यांना प्राधान्य

## मनपा आयुक्त वर्षा लड्डा यांचा इशारा

### शहरातील विविध भागात प्रत्यक्ष पाहणी, आढावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० अमरावती**
मनपा आयुक्त वर्षा लढा यांनी शुक्रवारला प्रमुख रस्त्याच्याविकासकामांसह प्रधानमंत्री आवास योजना घटक क्रमांक ३ अंतर्गत सुरू असलेल्या बेनोडा येथील सदनिकांची पाहणी करून आढावा घेतला. प्रकल्पातील काही मूलभूत सुविधांच्या कामांमध्ये विलंब होत असल्याबद्दल नाराजी व्यक्त केली असता १२२ लाभार्थ्यांनी अद्याप त्यांचा लाभार्थी हिस्सा हिस्सा महानगरपालिकेकडे जमा केलेला नाही. त्यामुळे लाभार्थ्यांनी येत्या १० जूनच्या आत आवश्यक लाभार्थी हिस्सा न भरल्यास प्रतीक्षा यादीतील पात्र लाभार्थ्यांना सदनिकाचे वाटप करण्यात येईल, असा इशारा यावेळी मनपा आयुक्त वर्षा लड्डा यांनी दिला.



महानगरपालिका प्रशासनाकडून शहरातील प्रमुख रस्त्यांच्या विकासकामांना वेग देण्यात येत असून, या कामांची गुणवत्ता आणि प्रगती तपासण्यासाठी महानगरपालिका आयुक्त वर्षालड्डा यांनी आज सकाळी ७.३० वाजता विविध भागांची प्रत्यक्ष पाहणी केली. शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांवर सुरू असलेल्या काँक्रीटीकरण, पेव्हिंग ब्लॉक आणि प्रधानमंत्री आवास योजना कामांची माहिती संबंधित अभियंते आणि अधिकाऱ्यांकडून घेऊन त्यांनी कामे वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.

यासंदर्भात आयुक्त वर्षा लड्डा यांनी लाभार्थ्यांना १० जूनपर्यंत आवश्यक रक्कम भरून प्रकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले. तसेच निर्धारीत मुदतीत लाभार्थी हिस्सा जमा न केल्यास प्रतीक्षा यादितील पात्र लाभार्थ्यांना सदनिकाचे वाटप करण्यात येईल, असे मनपा आयुक्तांनी स्पष्ट केले.

# दोन दिवसात अवकाळी पावसाचा १२ गावांना फटका

## ९६ घरांची पडझड, २५.७५ हेक्टर पिकांचे नुकसान

## नांदगाव खंडेश्वर तालुक्यात सर्वाधिक ५२ घरांचे नुकसान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० नांदगाव खंडेश्वर**
अमरावती जिल्ह्यात गेल्या तीन दिवसांपैकी २६ ते २८ मे दरम्यान दोन दिवस अवकाळी पावसाने वादळी वाऱ्यासह तांडव घातले होते. या अवकाळी पावसाचा १२ गावांना फटका बसला असून शेतीपिकांसह घरांचे नुकसान झाले आहे. या कालावधीत जिल्ह्यात सरासरी ८.६ मिमी पावसाची नोंद झाली आहे. अतिवृष्टी किवा १०० मिमीपेक्षा जास्त पाऊस झालेल्या मंडळांची संख्या शून्य आहे. जिल्ह्यातील १२ गावांमध्ये ९६ घरांचे नुकसान झाले असून त्यामध्ये ९२ अंशतः पडझड



झालेली घरे आणि ११ गोठ्यांचे नुकसान समाविष्ट आहे. नांदगाव खंडेश्वर तालुक्यात सर्वाधिक ५२ घरांचे नुकसान झाले आहे. तसेच भातकुली तालुक्यातील १६ गावांमध्ये सुमारेसुमारे २५.७५ हेक्टर क्षेत्रातील पिकांचे नुकसान झाले आहे. पपई, लिबू, केळी, आंबा, टरबूज, सिताफळ, तीळ, मूग व भाजीपाला या पिकांना अवकाळी पावसाचा फटका बसला आहे. दरम्यान, या अवकाळी पावसात कोणतीही जीवितहानी, पशुधनाचीहानी अथवास्थलांतराची घटना घडलेली नसल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

# उद्याला दुर्मीळ 'ब्ल्यू मून'चा योग; आकाशप्रेमींसाठी पर्वणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**
येत्या रविवारी (दि. ३१) आकाशात दुर्मीळ मानला जाणारा 'ब्ल्यू मून' पाहण्याची संधी नागरिकांना मिळणार आहे.



या दिवशी मे महिन्यातील दुसरी पौर्णिमा येत असल्याने या पौर्णिमेच्या चंद्राला 'ब्ल्यू मून' असे संबोधले जाते. विशेष म्हणजे या खगोलीय घटनेचा चंद्राच्या रंगाशी कोणताही संबंध नसून तो नेहमीच्या पौर्णिमेप्रमाणेच दिसणार आहे.खगोलशास्त्रानुसार कोणत्याही दोन पौर्णिमांमध्ये सुमारे २९.५ दिवसांचे अंतर असते.

त्यामुळे एखाद्या महिन्याच्या सुरुवातीलाच पहिली पौर्णिमा आली, तर त्याच महिन्याच्या अखेरीस दुसरी पौर्णिमा येऊ शकते. अशा वेळी दुसऱ्या पौर्णिमेला 'ब्ल्यू मून' असे नाव दिले जाते. यंदा मे महिन्यात १ मे रोजी पहिली पौर्णिमा झाली होती, तर ३१ मे रोजी दुसरी पौर्णिमा होत असल्याने हा दुर्मीळ योग जुळून आला आहे.फेब्रुवारी महिना २८ दिवसांचा असल्याने त्या महिन्यात दोन पौर्णिमा कधीच येत नाहीत. मात्र इतर कोणत्याही महिन्यात अशी शक्यता असते.

साधारणपणे दर ३० महिन्यांनी एकदा 'ब्ल्यू मून'चा योग येतो. यापूर्वी ३० ऑगस्ट २०२३ रोजी हा योग आला होता. यानंतर ३१ डिसेंबर २०२८ रोजी पुन्हा एकदा 'ब्ल्यू मून' पाहायला मिळणार आहे.इतिहासात 'ब्ल्यू मून'ची संकल्पना वेगवेगळ्या प्रकारे वापरली गेली आहे. प्राचीन काळात एका ऋतूमध्ये येणाऱ्या चौथ्या पौर्णिमेतील तिसऱ्या पौर्णिमेला 'ब्ल्यू मून' म्हटले जात असे. तसेच एखाद्या वर्षात १३ पौर्णिमा आल्यास तेराव्या पौर्णिमेलाही 'ब्ल्यू मून' संबोधण्याची प्रथा होती. काही वेळा एकाच वर्षात दोनदा 'ब्ल्यू मून'चा योगही येतो. विशेषतः जानेवारी महिन्यात पहिला आणि मार्च महिन्यात दुसरा 'ब्ल्यू मून' दिसण्याची शक्यता असते. असे चक्र सुमारे १९ वर्षांनी पुन्हा घडते.खगोल अभ्यासकांनी नागरिकांना या घटनेबाबत अंधश्रद्धांना बळी न पडण्याचे आवाहन केले आहे. 'ब्ल्यू मून' हा केवळ खगोलीय योग असून त्याचा शुभ-अशुभ घटनांशी कोणताही संबंध नाही. हा चंद्र इतर पौर्णिमांप्रमाणेच असतो. त्यामुळे आकाशातील या दुर्मीळ दृश्याचा आनंद घ्यावा आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून या घटनेकडे पाहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## मनोज जरांगेंच्या मालमत्तेची ईडी चौकशी करा:अमोल खुणे यांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० बीड–** मराठा आंदोलक मनोज जरांगे व त्यांच्या सहकाऱ्यांच्या मालमत्तेची ईडी चौकशी करण्याची मागणी जरांगेंना मारण्याची सुपारी घेतल्याच्या प्रकरणातील आरोपी अमोल खुणे यांनी शनिवारी केली. मनोज जरांगेंच्या प्रॉपर्टीत अचानक कशी



वाढ झाली? त्यांच्या सहकाऱ्यांनी कोट्यवधी रुपयांच्या जमिनी अचानक कशा घेतल्या? विशेषतः एका व्यक्तीचा तब्बल ५ कोटींचा बोजा तहसीलदारांनी कसा माफ केला? अशा विविध प्रश्नांची सरबत्ती या प्रकरणी अमोल खुणे यांनी केली आहे.या प्रकरणी सरकारवर टीकेची झोड उठली असताना अमोल खुणे यांनी मनोज जरांगे व त्यांच्या सहकाऱ्यांच्या ईडी चौकशीची मागणी केली आहे.

# उच्च शिक्षणमंत्र्यांच्या मध्यस्थीनंतर विद्यापीठ कर्मचाऱ्यांचे आंदोलन स्थगित

## महिनाभरात मागण्या न मान्य झाल्यास पुन्हा आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती** विविध प्रलंबित मागण्यांसाठी विद्यापीठ कर्मचारी संघाने पुकारलेले श्रृंखलाबद्ध आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे. राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांच्या मध्यस्थीनंतर संघाने हा निर्णय घेतला, अशी घोषणा संस्थापक अध्यक्ष अजय देशमुख यांनी केली.

या स्थगितीनुसार, २९ मे रोजी विभागीय सहसंचालक कार्यालयासमोर होणारे एकदिवसीय धरणे आंदोलन, १ जून रोजीचा लाक्षणिक कामबंद आणि त्यानंतर ८ जूनपासूनचा संप तूर्त थांबवण्यात आला आहे. मात्र, महिनाभरात मागण्या मान्य होण्याच्या दृष्टीने शासनाने पावले न उचलल्यास हे आंदोलन थांबवलेल्या टप्प्यापासून पुढे रेटले जाईल, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. राज्य शासनाने संघाचे अध्यक्ष अजय देशमुख यांना मुंबई येथे चर्चेसाठी बोलावले होते. तेथे झालेल्या चर्चेत उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी शासन महिनाभरात यावर तोडगा काढेल, असे आश्वासन दिले. या आश्वासनानंतरच




आंदोलनाची तात्पुरती स्थगिती जाहीर करण्यात आली .कर्मचाऱ्यांच्या प्रमुख मागण्यांमध्ये सातव्या वेतन आयोगानुसार १०, २० व ३० वर्षांनंतर देय असलेली सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना तात्काळ लागू करणे, सार्वजनिक विद्यापीठांतील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी या आयोगाची अंमलबजावणी करणे, २००५ पूर्वी जाहिरात प्रक्रिया पूर्ण होऊन २००५ नंतर नियुक्ती मिळालेल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करणे, आणि २०१३ पासूनची भरती बंदी विचारात घेऊन पदोन्नतीचे प्रमाण ५०:५० ऐवजी ८०:२० करणे यांचा समावेश आहे.

आंदोलन सुरू असतानाच राज्यात विधान परिषदेच्या निवडणुकांची घोषणा झाली. १९ मे रोजी दुपारपासून लागू झालेली आचारसंहिता आगामी २५ जूनपर्यंत अस्तित्वात आहे. या काळात शासनाला कोणतीही नवी घोषणा करता येत नाही. ही वस्तुस्थिती आंदोलनकर्त्यांच्या लक्षात आणून दिल्याने तूर्त स्थगितीचा निर्णय घेण्यात आला. आचारसंहिता संपल्यानंतर शासन आणि संघटनेचे पदाधिकारी एकत्रितपणे तोडगा घोषित करतील.

# अंजनगाव सुर्जी तालुक्यात बनावट देशी-विदेशी दारूचा सुळसुळाट

## राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि३० अजंनगाव सुर्जी**
अमरावती जिल्ह्यातील अंजनगाव सुर्जी तालुक्यात अवैध दारू विक्रीचा व्यवसाय दिवसेंदिवस वाढत असून मध्यप्रदेश सीमावर्ती भागातून मोठ्या प्रमाणावर डुप्लिकेट देशी व नामांकित इंग्लिश दारूची तस्करी होत असल्याची गंभीर बाब समोर येत आहे. ग्रामीण भागातील खेडी-पाड्यांमध्ये बनावट मद्याचा पुरवठा सुरू असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. मात्र, या सर्व प्रकाराकडे राज्य उत्पादन शुल्क विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे.तालुक्याच्या सीमेलगत असलेल्या मध्यप्रदेशातून रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणावर बनावट देशी व इंग्लिश दारूची वाहतूक केली जात असल्याची माहिती स्थानिक सूत्रांनी दिली आहे. विशेष म्हणजे नामांकित कंपन्यांच्या बाटल्या, लेबल आणि पॅकिंगचा वापर करून ग्रामीण भागात या दारूची विक्री केली जात आहे. त्यामुळे ग्राहकांना ही दारू खरी की बनावट, हे ओळखणे कठीण होत आहे. सातपुडा पर्वतरांगांलगतच्या दुर्गम खेड्या-पाड्यांमध्ये काही टोळ्या सक्रिय असून त्या भागात डुप्लिकेट दारूचे पिकिंग म्हणजेच साठवण व पॅकिंग केले जात असल्याची माहिती समोर येत आहे. त्यानंतर ही दारू अंजनगाव सुर्जी तालुक्यासह परिसरातील गावांमध्ये पुरवठा केली जात असल्याचे बोलले जात आहे. काही ठिकाणी किराणा दुकानांच्या आडून, तर काही ठिकाणी गुप्त अड्ड्यांवरून ही विक्री सुरू असल्याची चर्चा आहे.स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, अनेक वेळा संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रारी करूनही ठोस कारवाई होत नसल्याने अवैध दारू विक्रेत्यांचे मनोबल वाढले आहे. राज्य उत्पादन शुल्क विभाग,, आणि स्थानिक यंत्रणांमध्ये समन्वयाचा अभाव असल्याने हा व्यवसाय खुलेआम सुरू असल्याचा आरोप होत आहे.ग्रामीण भागातील युवक आणि मजूर वर्ग या स्वस्त दरातील बनावट



दारूच्या आहारी जात असल्याचे चित्र आहे. अनेकदा अशा दारूमुळे विषबाधा, आरोग्य बिघडणे आणि गंभीर आजार उद्भवण्याचा धोका निर्माण होतो. तरीही संबंधित विभागाकडून प्रभावी मोहीम राबवली जात नसल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे.विशेष म्हणजे काही भागात वाहतुकीसाठी दुचाकी, चारचाकी आणि मालवाहू वाहनांचा वापर केला जात असल्याचे सांगितले जाते. रात्रीच्या अंधारात सीमावर्ती रस्त्यांवरून ही वाहतूक होत असल्याने प्रशासनाच्या गस्तीवरही प्रश्न उपस्थित होत आहेत. काही ठिकाणी स्थानिक स्तरावर सेटिंग करूनच हा व्यवसाय सुरू असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

दरम्यान, अवैध दारू विक्रीमुळे शासनाचा महसूल बुडत असून दुसरीकडे नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याची भावना जनतेत आहे. प्रशासनाने वेळेत कठोर पावले उचलली नाहीत तर भविष्यात मोठी पुण्यातील फुगेवाडी सारखी दुर्घटना घडण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे.

### मध्य प्रदेशातून थेट पुरवठा

; बनावट देशी दारूचे जाळेसूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अंजनगाव सुर्जी तालुक्याला लागून असलेल्या सीमावर्ती भागाचा आणि मध्य प्रदेशच्या काही भागांचा फायदा घेत तस्कर सक्रिय झाले आहेत. मध्य प्रदेशातून अत्यंत कमी दरात निकृष्ट दर्जाचे स्पिरिट आणि बनावट दारू छुप्या मार्गाने तालुक्यात आणली जाते. त्यावर स्थानिक स्तरावर बनावट लेबल आणि सील लावून ती अस्सल देशी दारू म्हणून चढ्या दराने विकली जाते. ही दारू इतकी घातक आहे की, यामुळे कोणत्याही क्षणी मोठी विषबाधा होऊन जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.–

# खड्डा चुकवताना ट्रक-पिकअपची भीषण धडक

## सुदैवाने जीवितहानी टळली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० मोर्शी** मोर्शी-चांदूर बाजार मार्गावरील चारगड नदी पुलावर अपघात, वाहतूक काही काळ ठप्पमोर्शी, दि. ३० मे : मोर्शी-चांदूरबाजार मार्गावरील उदखेड येथील चारगड नदी पुलावर शनिवारी सकाळी भीषण अपघात घडला. रस्त्यावरील खड्डा चुकविण्या च्या प्रयत्नात ट्रक आणि पिकअप वाहनाची समोरासमोर जोरदार धडक झाली. या अपघातात दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले असले तरी सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही. मिळालेल्या माहितीनुसार, ट्रक क्रमांक एमएच ३१ एफसी ३६४५ हा भिलाई येथून अंजनगावकडे केळी भरण्यासाठी जात होता. तर एमएच १९ सीएक्स ०८०० क्रमांकाचे पिकअप वाहन जळगाव येथून वरूडकडे स्प्रिंकलरचे साहित्य घेऊन निघाले होते. सकाळी सुमारे सात वाजताच्या सुमारास



उदखेड येथील चारगड नदी पुलावर दोन्ही वाहने आली असता रस्त्यावरील मोठा खड्डा चुकविण्याच्या प्रयत्नात चालकांचे नियंत्रण सुटले आणि दोन्ही वाहनांमध्ये जोरदार धडक झाली.अपघातानंतर दोन्ही वाहने रस्त्याच्या मधोमध आडवी झाल्याने काही काळ वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक आणि वाहतूक पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत वाहतूक सुरळीत करण्यासाठी प्रयत्न केले. त्यानंतर वाहनांची बाजूला व्यवस्था करण्यात आली आणि वाहतूक पुन्हा सुरू झाली.या अपघातानंतर परिसरातील नागरिकांनी रस्त्याच्या दुरवस्थेबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. संबंधित मार्गावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून वाहनचालकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत असल्याचे नागरिकांनी सांगितले. प्रत्येक वेळी अपघात झाल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का? असा संतप्त सवालही नागरिकांकडून उपस्थित करण्यात आला. रस्त्यावरील खड्डे तातडीने बुजवून सुरक्षित वाहतुकीची व्यवस्था करावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

# मेळघाटातून चारोळी हद्दपार; आदिवासींच्या पारंपरिक रोजगारावर संकट

## वनविभागाच्या दुर्लक्षामुळे दुर्मीळ वृक्षप्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०चिखलदरा**
मेळघाटातील आदिवासी बांधवांच्या आर्थिक उन्नतीचा महत्त्वाचा आधार असलेली चारोळी (चिरोंजी) आता नामशेष होण्याच्या उंबरठ्यावर पोहोचली आहे. निसर्गातील बदल, वाढते दुर्लक्ष आणि वनविभागाच्या संवर्धना बाबतच्या उदासीन भूमिकेमुळे मेळघाटातील अनेक भागांतून चारोळीची झाडे जवळपास हद्दपार झाली आहेत. परिणामी, या वनसंपत्तीवर अवलंबून असलेल्या शेकडो आदिवासी कुटुंबांच्या पारंपरिक रोजगारावर मोठे संकट ओढवले आहे. मेळघाटातील काटकुंभ, काजल डोह, होमा, कणेरी, बामदेही, कोयलारी, कोरडा, पाचडोंगरी, गांगरखेडा, कोटमी, दहेंद्री, बगदारी, तोरणवाडी, बुटीदा, जारीदा आणि घाणा या गावांच्या परिसरात एकेकाळी चारोळीचे मोठ्या प्रमाणावर नैसर्गिक उत्पादन होत असे. स्थानिक आदिवासी बांधव जंगलातून चारोळी गोळा करून त्याची विक्री करत असत. या उत्पन्नातून अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह चालत होता. मात्र, गेल्या काही वर्षांत चारोळीच्या झाडांची संख्या झपाट्याने घटत असल्याचे चित्र समोर आले आहे.तज्ज्ञांच्या मते, या परिसरातील बहुतांश चारोळीच्या झाडांचे वय सध्या २५ ते ३० वर्षांदरम्यान आहे. वयोमानानुसार अनेक झाडे सुकू लागली असून त्यांची उत्पादनक्षमताही कमी झाली आहे. याहून गंभीर बाब म्हणजे वनविभागाकडून नव्या झाडांची लागवड किंवा पुनरुत्पादनासाठी कोणतीही ठोस योजना राबविण्यात आलेली




नाही. त्यामुळे या दुर्मीळ वृक्षप्रजातीचे अस्तित्वच धोक्यात आले आहे.चारोळी हे केवळ वनउत्पादन नसून त्याला मोठे आर्थिक महत्त्व आहे. एका प्रौढ झाडापासून एका हंगामात साधारण २० ते २५ किलो उत्पादन मिळू शकते. प्रक्रिया केलेल्या उच्च दर्जाच्या चारोळीला देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मोठी मागणी असून तिचा दर दोन हजार ते तीन हजार रुपये प्रतिकिलोपर्यंत पोहोचतो. त्यामुळे एका झाडापासून वर्षाकाठी दहा हजार रुपयांपेक्षा अधिक उत्पन्न मिळू शकते. अशा परिस्थितीत चारोळीचे संवर्धन झाल्यास आदिवासींसाठी हा रोजगाराचा शाश्वत आणि फायदेशीर पर्याय ठरू शकतो.वृक्षप्रेमी, पर्यावरण अभ्यासक आणि स्थानिक शेतकरी यांनी चारोळी संवर्धनासाठी विशेष मोहीम हाती घेण्याची मागणी केली आहे. शासनाने आदिवासी व गैरआदिवासी शेतकऱ्यांना दर्जेदार रोपे उपलब्ध करून दिल्यास मोठ्या प्रमाणावर लागवड होऊ शकते. तसेच मेळघाटातील कुपोषण, बेरोजगारी आणि स्थलांतर यांसारख्या समस्यांवरही काही प्रमाणात उपाय मिळू शकतो.स्थानिक नागरिकांच्या मते, बाजारात मोठी मागणी असतानाही चारोळीची रोपे सहज उपलब्ध होत नाहीत. वनविभागाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन विशेष वृक्षसंवर्धन कार्यक्रमांतर्गत मेळघाटात चारोळीची मोठ्या प्रमाणावर लागवड करावी. अन्यथा मेळघाटाची ओळख असलेली ही बहुगुणी आणि मौल्यवान वनसंपत्ती कायमची इतिहासजमा होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# लाखो रुपये खर्चून उभारलेले ओटे ठरले निरुपयोगी, व्यापाऱ्यांनी फिरवली पाठ

## नगरपालिकेच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०दर्यापूर**
शहरातील छोट्या व गरजू व्यावसायिकांना व्यवसायासाठी कायमस्वरूपी जागा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने दर्यापूर नगरपालिकेने आठवडी बाजार परिसरात लाखो रुपये खर्च करून ओटे उभारले होते. मात्र, योग्य नियोजनाचा अभाव आणि मूलभूत सुविधांची कमतरता यामुळे हे ओटे आजही बहुतांश रिकामे पडून असल्याचे चित्र दिसून येत आहे.शहरातील रस्त्यावरील अनधिकृत व्यवसाय कमी करणे, आठवडी बाजारात शिस्त निर्माण करणे आणि लघु व्यावसायिकांना सुरक्षित जागा उपलब्ध करून देणे हा या



प्रकल्पामागील मुख्य उद्देश होता. मात्र, ओटे उभारल्यानंतर व्यापाऱ्यांनी त्यांचा वापर करण्यास फारसा प्रतिसाद दिला नाही. परिणामी संपूर्ण परिसर ओस पडला असून अनेक ओट्यांवर कचऱ्याचे साम्राज्य निर्माण झाले आहे. काही ठिकाणी झाडाझुडपे वाढली असून काही ओट्यांवर जनावरांनी मुक्काम ठोकल्याचेही दिसून येत आहे.एकीकडे अनेक छोटे व्यापारी आजही हातगाड्या, फुटपाथ किंवा रस्त्याच्या कडेला उन्हात-पावसात व्यवसाय करताना दिसतात, तर दुसरीकडे त्यांच्यासाठी उभारण्यात आलेली सुविधा वापराविना पडून आहे. त्यामुळे नगरपालिकेच्या नियोजन आणि निधी वापराबाबत नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. व्यापाऱ्यां च्या मते, बाजार परिसरातील काही ओट्यांच्या ठिकाणी ग्राहकांची वर्दळ नसल्याने व्यवसायाला अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही. तसेच पाणी, वीज, स्वच्छता, सुरक्षा आणि पार्किंगसारख्या मूलभूत सुविधांचाही अभाव असल्याने व्यापाऱ्यांनी या ठिकाणी व्यवसाय करण्यास नकार दिला आहे.लाखो रुपयांचा खर्च करून उभारलेली ही सुविधा आज उपयोगाअभावी धूळ खात पडली आहे. त्यामुळे या ओट्यांचा प्रत्यक्ष वापर वाढविण्यासाठी नगरपालिकेने ठोस उपाययोजना कराव्यात आणि व्यापाऱ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. ओटे व्यापाऱ्यांच्या उपयोगात नेमके कधी येणार, हा प्रश्न मात्र अद्याप अनुत्तरित आहे.

# जिल्ह्यातील ५४७ ग्रामपंचायतींचा कारभार व्हेंटिलेटरवर

## अनेक गावातील विकास कामे पडली ठप्प




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती-** जिल्ह्यातील मुदत संपलेल्या ५७४ ग्रामपंचायतींच्या निवडणुका डिसेंबरमध्ये होण्याची शक्यता आहे.

मात्र, त्यापूर्वीच या ग्रामपंचायतींच्या १ प्रशासकीय आणि आर्थिक कारभारावरून मोठा कायदेशीर पेच निर्माण झाला आहे. शासनाने विद्यमान सरपंचांना प्रशासक म्हणून नियुक्त केले असले, तरी उच्च न्यायालयाने त्यांच्या आर्थिक व्यवहारांवर बंदी घातल्याने ग्रामीण विकासकामे ठप्प झाली आहेत.ग्रामपंचायतींचा कार्यकाळ संपल्यानंतर शासनाने एका अधिसूचनेद्वारे विद्यमान सरपंचांची प्रशासक म्हणून नियुक्ती केली होती.मात्र, या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. केवळअधिसूचनेच्या आधारे सरपंचांना अधिकार देणे बेकायदेशीर असून, त्यासाठी कायद्यात बदल करून राज्यपालांचा अध्यादेश काढणे आवश्यक होते, असे मत व्यक्त केले जात आहे. परिणामी, न्यायालयाने सरपंचांच्या आर्थिक व्यवहारांवर निर्बंध घातल्याने महत्त्वाचे विकास कामे रखडली आहेत. केवळ कर्मचाऱ्यांचे पगार, वीजबिले अशाच व्यवहाराला मुभा दिली आहे. अखिल भारतीय सरपंच परिषदेने या गोंधळासाठी ग्रामविकास विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांवर गंभीर आरोप केले आहेत. 'मुख्यमंत्री आणि ग्रामविकास मंत्री या प्रश्नावर सकारात्मक असतानाही, अधिकाऱ्यांनी घाईघाईने केवळ अधिसूचना काढून कायदेशीर पळवाट ठेवल्याचा आरोप महाराष्ट्र राज्य सरपंच महासंघाने केला आहे.

**प्रमुख मागण्या-**
राज्यपालांचा अध्यादेश काढून सरपंचांना कायदेशीररित्या पूर्ण प्रशासकीय व आर्थिक अधिकार द्यावेत. तोडगा निघत नाही, तोपर्यंत सरपंचांना प्रशासक ठेवून आर्थिक व्यवहारांचे अधिकार (बीडीओ) सोपवावेत. विस्तार अधिकाऱ्यांची नियुक्ती प्रशासक म्हणून नियुक्ती करावी,

# 'सुंदर शाळा' स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिसांची प्रतीक्षा

## शिक्षण विभागाकडे पाठपुरावा सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**
शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र यांच्या वतीने राबविण्यात आलेल्या 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' या उपक्रमात अमरावती जिल्ह्यातील अनेक शाळांनी उल्लेखनीय कामगिरी करत तालुका व जिल्हास्तरावर क्रमांक प्राप्त केले होते. मात्र मागील शैक्षणिक सत्र २०२५-२६ मधील विजेत्या शाळांना जाहीर करण्यात आलेली बक्षिसांची रक्कम अद्यापही प्राप्त झालेली नाही. परिणामी मुख्याध्यापक, शिक्षक व शाळा व्यवस्थापन समित्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.या उपक्रमांतर्गत शाळांची स्वच्छता, सुशोभिकरण, विद्यार्थी सहभाग, पर्यावरणपूरक उपक्रम, शैक्षणिक वातावरण आणि नावीन्यपूर्ण उपक्रमांच्या आधारे मूल्यमापन करण्यात आले होते.जिल्ह्यातील अनेक शाळांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत स्वतःच्या निधीतून तसेच लोकसहभागातून शाळांचे सुशोभिकरण केले. स्पर्धेत यशमिळाल्यानंतर शासनाकडून जाहीर बक्षीस रक्कम मिळेल, या अपेक्षेने विविध विकासकामेही करण्यात आली होती.मात्र निकाल जाहीर होऊन अनेक महिने उलटल्यानंतरही निधी वितरणाबाबत कोणतीही स्पष्ट




माहिती देण्यात आलेली नाही. त्यामुळे संबंधित शाळांवर आर्थिक ताण निर्माण झाला असून शिक्षकांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. काही शाळांनी याबाबत जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभाग तसेच गट शिक्षणाधिकारी कार्यालयाकडे पाठपुरावाही केला आहे.दरम्यान, विजेत्या शाळांना तातडीने बक्षीस रक्कम वितरित करून शासनाने दिलेला शब्द पाळावा, अशी मागणी शिक्षक संघटना व शाळा व्यवस्थापन समित्यांकडून करण्यात येत आहे. शासनाने निधी वितरणा बाबत स्पष्ट भूमिका जाहीर करून प्रलंबित रक्कमलवकर वितरित करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. ही रक्कम जर शाळांना प्राप्त झाली तर शाळा सुरू होण्यापूर्वी शालेय सुविधा किंवा इतर बाबींवर खर्च करता येईल.

### असे आहे जिल्हा, तालुका पुरस्कारांचे स्वरूप

या उपक्रमांद्वारे जिल्ह्यातील शासकीय आणि खासगी शाळा अशा दोन गटात प्रथम, द्वितीय आणि तृतीय असे बक्षीस जिल्हा स्तरावर आणि तालुका स्तरावर दिले जातात. जिल्ह्यात प्रथम आलेली शाळा विभाग स्तरावर स्पर्धेमध्ये भाग घेत असते. यात जिल्हा पातळीवर प्रथम क्रमांक प्राप्त केलेल्या शाळेला ११ लाख, द्वितीय ५ लाख तर तृतीय क्रमांक पटकावलेल्या शाळेला २ लाखांचे बक्षीस दिले जाणार आहे. तालुका पातळीवर प्रथम, द्वितीय व तृतीय पुरस्कारप्राप्त शाळांना अनुक्रमे ३ लाख, २ लाख व १ लाखाचे बक्षीस दिले जाईल. नवीन शैक्षणिक सत्र सुरू होऊनही बक्षिसांची रक्कम प्राप्त झालेली नाही. जिल्हा शिक्षण विभागाला ही रक्कम प्राप्त झालेली नाही, असे समजते.

# जनगणनेत उघड होत आहे ग्रामीण वास्तव; प्रगणकांसमोर समस्यांचा पाढा

## नागरिकांच्या प्रश्नांनी वाढली प्रशासनाची जबाबदारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अचलपूर**
२८भारत सरकारच्या वतीने सुरू असलेल्या जनगणना प्रक्रियेला ग्रामीण भागात चांगला प्रतिसाद मिळत असून चिमूर तालुक्यातील गावागावांत प्रगणकांकडून घरोघरी जाऊन माहिती संकलनाचे काम वेगाने सुरू आहे. मात्र, या प्रक्रियेदरम्यान एक वेगळेच वास्तव समोर येत आहे. लोकसंख्येची माहिती देण्यासोबतच नागरिक आपल्या दैनंदिन जीवनाशी निगडित विविध समस्या, शासकीय योजनांबाबतच्या शंका आणि अपेक्षा प्रगणकांसमोर मांडताना दिसत आहेत.

जनगणनेच्या निमित्ताने शासनाचा प्रतिनिधी घरापर्यंत पोहोचत असल्याने अनेक नागरिकांना आपल्या अडचणी सांगण्यासाठी एक व्यासपीठ मिळाल्याची भावना निर्माण



### जनगणना की समस्यांची नोंद?

झाली आहे. विशेषतः वयोवृद्ध महिला, ज्येष्ठ नागरिक, आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबे तसेच बेरोजगार युवक रेशन कार्ड, वृद्धापकाळ पेन्शन, श्रावणबाळ योजना, घरकुल योजना, एसटी सवलत पास, दारिद्र्यरेषेखालील यादीतील नावे आदी विषयांबाबत प्रश्न विचारत आहेत.रेशन कार्ड बंद होणार का?, घरकुल योजनेचा लाभ कधी मिळणार?, पेन्शन सुरू राहील ना?, बीपीएल यादीतून नाव कमी होणार नाही ना? अशा स्वरूपाचे प्रश्न अनेक घरांमध्ये प्रगणकांना ऐकावे लागत आहेत. काही ठिकाणी नागरिकांनी आपल्या गावातील रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य सुविधा, रोजगाराच्या संधी आणि शिक्षणाशी संबंधित प्रश्नही मांडले आहेत.ग्रामीण भागातील नागरिकांच्या मते, जनगणना फॉर्ममध्ये समस्या नोंद किंवा स्थानिक गरजा यासाठी स्वतंत्र कॉलम असावा. त्यामुळे शासनाला थेट नागरिकांच्या अडचणींची माहिती मिळून नियोजन अधिक प्रभावी होऊ शकते. अनेक नागरिकांनी अशी मागणी प्रगणकांमार्फत व्यक्त केली आहे.सकाळ आणि दुपारच्या वेळेत प्रगणक घरांपर्यंत पोहोचत असल्याने महिला आणि ज्येष्ठ नागरिक अधिक मोकळेपणाने संवाद साधत आहेत. अनेक कुटुंबांनी शासनाच्या विविध योजनांबाबत माहितीचा अभाव असल्याचेही सांगितले. काहींनी लाभ मिळण्यासाठी होणारा विलंब, कागदपत्रांच्या अडचणी आणि कार्यालयीन प्रक्रियेतील गुंतागुंत याबाबत नाराजी व्यक्त केली.जनगणना प्रक्रियेदरम्यान निर्माण होणारा हा संवाद प्रशासनासाठी महत्त्वाचा ठरू शकतो. कारण लोकसंख्येची आकडेवारी गोळा करण्या बरोबरच नागरिकांच्या भावना, अपेक्षा आणि अडचणीही यामुळे समोर येत आहेत. ग्रामीण भागातील सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीचे वास्तव या प्रक्रियेतून अधोरेखित होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

स्थानिक नागरिक मंगेश ताजने यांनी सांगितले की, जनगणना ही केवळ आकडेवारी गोळा करण्याची प्रक्रिया नाही. गावातील सामान्य माणसाच्या समस्या आणि अपेक्षा याही यातून समोर येतात. शासनाने या प्रतिक्रियांकडे गांभीर्याने पाहून त्यावर उपाययोजना करणे गरजेचे आहे.

एकूणच, जनगणना लोकसंख्येची नोंद करण्यापली कडे जाऊन ग्रामीण भारतातील सामाजिक, आर्थिक आणि प्रशासकीय प्रश्नांचे वास्तव उघड करत आहे. त्यामुळे नागरिक आणि प्रशासन यांच्यातील संवादाचे प्रभावी माध्यम म्हणूनही जनगणनेकडे पाहिले जात आहे.

# शाळांच्या स्थलांतरावर शिक्षण विभागाची कडक नजर; विद्यार्थीहितासाठी नवे निकष लागू

## कमी पटसंख्येच्या शाळांना स्थलांतरास नकार; आधार प्रमाणीकरण, आरटीई सुविधा व आवश्यक प्रमाणपत्रे बंधनकारक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**
राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांच्या स्थलांतर प्रक्रियेत पारदर्शकता, शिस्त आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने शालेय शिक्षण विभागाने कठोर नवे निकष लागू केले आहेत. या निर्णयामुळे विनाकारण किंवा व्यावसायिक हेतूने होणाऱ्या शाळांच्या स्थलांतरांवर मोठा आळा बसणार असून विद्यार्थ्यांच्या शिक्षणात सातत्य राखण्यास मदत होणार आहे.

नव्या नियमांनुसार २० पेक्षा कमी विद्यार्थ्यांच्या प्राथमिक शाळा तसेच ४० पेक्षा कमी विद्यार्थ्यांच्या माध्यमिक शाळांच्या स्थलांतर प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही. शाळांच्या स्थलांतराबाबत निर्णय घेताना विद्यार्थ्यांचे हित, शिक्षणाची गुणवत्ता आणि पालकांची गैरसोय या बाबींना सर्वोच्च प्राधान्य दिले जाणार आहे.शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे की, नैसर्गिक आपत्ती, शाळेची इमारत असुरक्षित होणे, विद्यार्थ्यांची वाढती संख्या किंवा अन्य अपरिहार्य कारणे असल्यासच स्थलांतरास परवानगी दिली जाईल.

केवळ आर्थिक किंवा व्यावसायिक कारणांवर आधारित स्थलांतर प्रस्तावांना मान्यता मिळणार नाही.विद्यार्थ्यांना दूरचा प्रवास करावा लागू नये यासाठी शाळांच्या स्थलांतरासाठी अंतर मर्यादाही निश्चित करण्यात आली आहे. विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी हा नियम महत्त्वाचा ठरणार आहे.स्थलांतर



प्रस्तावासाठी विद्यार्थ्यांचे १०० टक्के आधार प्रमाणीकरण अनिवार्य करण्यात आले आहे. शाळेतील प्रत्यक्ष विद्यार्थ्यांची संख्या निश्चित करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला असून अपूर्ण माहिती असलेले प्रस्ताव फेटाळले जाणार आहेत.नव्या ठिकाणी शाळा स्थलांतरित करताना शिक्षणाचा हक्क (आरटीई) कायद्यानुसार आवश्यक असलेल्या सर्व भौतिक सुविधा उपलब्ध असणे बंधनकारक राहणार आहे. वर्गखोल्या, स्वच्छतागृहे, शुद्ध पिण्याचे पाणी, खेळाचे मैदान यांसारख्या सुविधांची पडताळणी झाल्यानंतरच परवानगी दिली जाणार आहे.याशिवाय स्थानिक स्वराज्य संस्था, अग्निशमन विभाग, बांधकाम सुरक्षितता आणि इमारत वापर परवानगी यांसंबंधीची प्रमाणपत्रे सादर करणे अनिवार्य करण्यात आले आहे. सर्व कागदपत्रांची तपासणी पूर्ण झाल्यानंतरच स्थलांतर प्रस्ताव मंजूर केला जाणार आहे.

तात्पुरत्या स्वरूपातील स्थलांतरासाठीही विभागाने स्वतंत्र नियम निश्चित केले असून विद्यार्थ्यांच्या शिक्षणात कोणताही अडथळा निर्माण होणार नाही, याची खात्री करूनच अशा प्रस्तावांना मंजुरी दिली जाणार आहे. विद्यार्थ्यांचे हित सर्वोच्च ठेवूनच सर्व निर्णय घेतले जातील, असे शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.